

# जनावरांतील परजीवींचा प्रादुर्भाव व नियंत्रण

जनावरांमध्ये परजीवींच्या प्रादुर्भावामुळे आजार होतात. परजीवीपासून संरक्षण करण्यासाठी परजीवींचे योग्य नियंत्रण करणे महत्त्वाचे आहे. जनावरांमध्ये प्रामुख्याने बाह्य व शरीरांतर्गत आढणारे परोपजीवी असतात. बाह्यपरोपजीवीमध्ये सर्व प्रकारचे कीटकवर्गीय गोचीड, गोमाश्या, पिसवा इत्यादी तर शरीरामध्ये प्रामुख्याने गोलकृमी, पट्टकृमी, चपटेकृमी किंवा पर्णकृमी जंत आढळतात. जनावरांची अतिआवश्यक जीवनसत्त्वे हे परोपजीवी शोषतात आणि आपला जीवनक्रम पूर्ण करतात. त्यामुळे जनावरांमध्ये अतिआवश्यक कमतरता भासते व ते इतर रोगांना बळी पडतात. हे लक्षात घेऊन वेळीच पशुतज्ज्ञांकडून उपाययोजना करावी.

परोपजीवींच्या प्रादुर्भावामुळे जनावरांची भूक मंदावते. दुध उत्पादन कमी होते, द्रव्यांची वासरांची वाढ कमी होते, त्वचा निस्तेज दिसते, जनावरांमध्ये चयापचय प्रक्रियेचा वेग कमी होऊन बरोबर अन्नाचे पूर्ण पचन होत नाही. आतड्यामधील विविध प्रकारच्या परोपजीवींमुळे आतड्यामधील जीवनसत्त्वे शोषण करण्याचा भाग कमी होतो. जनावरांच्या शरीरामध्ये प्रथिने तयार होण्याचे प्रमाण कमी होते. आतड्यांमधील परोपजवींमुळे जनावरांच्या शरीरामधील पाणी, सोडिअम व क्लोराईड यांच्या प्रमाणात बदल होतो. परोपजीवीमुळे जनावरांमधील रक्त व इतर प्रकारची द्रव्ये शरीरामधून शोषली जातात. त्यामुळे रक्तक्षय (अॅनेमिया) होतो. परोपजीवी हे जनावरांच्या शरीरामध्ये विविध भागांमध्ये वाढतात व त्या भागावर राहून त्यावर आपली उपजीविका करतात. रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम होऊन जनावर आजारी पडतात.

पट्टकृमी जनावराच्या आतड्यांमध्ये आठळ्या निर्माण करतात. काही परोपजीवी शरीरामधील मूळ जागा सोडून, शरीरामधील श्वासनलिका, पित्तनलिका, रक्तवाहिन्या यांच्या मार्गात अडथळा निर्माण करतात. जनावरांच्या रक्तामधील परोपजीवींमुळे रक्तामधील विविध पेशींचे प्रमाण कमी होते व रक्तक्षयसुद्धा होऊ शकतो. परोपजीवींमुळे जनावरांच्या शरीरामध्ये विषबाधा होऊन, जनावरे दगावूसुद्धा शकतात. परोपजीवींमुळे जनावरांच्या पेशींमध्ये दाह होऊन नैमित्तिक प्रक्रिया मंदावते किंवा कार्यक्षमता कमी होते. जनावरांच्या पचनसंस्थेचे कार्य बिघडते, चारा खाद्ययांचे पचन व्यवस्थित होत नाही.

परोपजीवींमुळे जनावरांची रोगप्रतिकारक क्षमता कमी होऊन जनावरे लहान लहान आजारांनाही बळी पडतात. परोपजीवींमुळे लहान जनावरांमध्ये सर्वात जास्त प्रमाणात दुष्परिणाम प्रामुख्याने जाणवतात, त्यामुळे जनावरांची वाढ खुटते, वजन कमी होते, शरीरावरील केस गळून जातात, रोगप्रतिकारक क्षमता कमी होते व लहान वासरे आंतरपरोपजीवींमुळे अचानक दगावूसुद्धा शकतात. काही परोपजीवी हे काही रोगांचे जिवाणू/विषाणू वाहनाचे काम एका जनावरापासून दुसऱ्या जनावरापर्यंत करत असतात.

**उपाययोजना :**

- पशुवैद्यकाच्या सल्ल्याने नियमित कालावधीत जंतनिर्मूलन करावे. सर्व जनावरांना एकाच वेळी जंतनिर्मूलन करावे.
- गोठ्यामध्ये सातत्याने ओलसरपणा नसावा. गोठा हेवशीर ठेवावा. गोठा स्वच्छ ठेवावा.
- अशक्त किंवा बाधित जनावरे निरोगी जनावरांपासून स्वतंत्र ठेवावीत.
- जनावरांना संतुलित आहार व खाद्य - पाणी द्यावे.
- नवीन येणाऱ्या किंवा विकत घेतलेल्या जनावरांचे पशुवैद्याकडून परीक्षण करून निरोगी कळपामध्ये सोडावे.
- लसीकरण, कृत्रिमरीत्या गाय भरणे, गव्हाणी व पाण्यासाठी वापरण्यात येणारी भांडी किंवा साधने व्यवस्थितरित्या निर्जंतुक करूनच वापरावीत.
- आजारी किंवा अशक्त जनावरांवर वेळीच उपचार करून त्यांना वेगळ्या ठिकाणी किंवा निरोगी जनावरांपासून वेगळे ठेवावे.
- एकाच वेळेस सर्व बाधित जनावरांना जंतनाशक औषधे पाजून घ्यावीत.
- वेळोवेळी जनावरांच्या शरीरावरील गोचिडीचे नियंत्रण करावे. गोठ्यातील खाचखळगे, कोपरे बुजवून घ्यावी.
- जनावरामध्ये आजाराचे किंवा अशक्तपणाचे लक्षण दिसताच तज्ज्ञ पशुवैद्याकडून सल्ला घेऊन, रक्त, शेण इत्यादी नमुने घेऊन प्रयोगशाळेमध्ये आजाराची तपासणी करून घ्यावी. योग्य निदान करून वेळीच उपचार करून घ्यावेत व होणारे आर्थिक नुकसान टाळावे.


प्रकाशन

**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत**

www.mafsu.in

www.knpcvs.in



✲ मार्गदर्शक ✲

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✲ संकलन ✲

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.